# आदिवासी-दलित स्त्रियांचे प्रश्न : सामाजिक व तात्त्विक दृष्टिकोन

रुजा पिता वेदेह अंग राजास-
'या इच्छे पुरिसो होतुं जाति जाति पुनप्पुनं,
सामिकं अपचायेय्य इन्दं च परिचारिकात ॥ '[१]

—महानारद कश्यप जातक

('ज्या स्त्रीची पुनःपुन्हा पुरुषाचाच जन्म घ्यायची इच्छा असेल, तिने पतीची (सामिकं) तशीच सेवा करावी जशी इंद्राची अप्सरा (देववेश्या) करतात.')

❈ ❈ ❈

भारतीय स्त्रीमुक्ती वयात आली आहे. पण, वयात आल्यानंतर शहाणपण येतेच असे नाही.

शहाबानोने सुप्रीम कोर्टापर्यंत जाऊन पोटगी मिळवून नवऱ्यावर विजय मिळवला, पण, मुसलमान मूलतत्त्ववाद्यांनी मुसलमान जनतेच्या मदतीने तिचा कोर्टाबाहेर पराभव केला. केरळच्या मेरी रॉयनेही सुप्रीम कोर्टापर्यंत जाऊन वारसाहक्क मिळवून विजय मिळवला; पण, ख्रिश्चन चर्चने ख्रिश्चन जनतेच्या मदतीने तिचा कोर्टाबाहेर पराभव केला. राजस्तानात देवराळचाला रूपकुवरवर सतीत्व लादले जाताच देशभर आरडाओरडा झाला; पण, खुद्द राजस्तानातील जनतेचे सार्वमत घेतले, तर ती सतीच्या बाजूनेच बहुसंख्येने कौल देईल ! केरळातील सुलेखाबीने जमातपंचायतीविरुद्ध कोर्टात दावा करून विजय मिळवला; पण, महाराष्ट्रातील फेमिनिस्टांसकट अन्य स्त्रिया आदिवासी जमातींच्या पंचायती आदिवासी स्त्रियांना लगेच व योग्य न्याय देतात असे विद्रोही आदिवासी स्त्रियांना सांगत आहेत.

म्हणून आम्ही म्हटले की, वयात आल्यानंतर शहाणपण येतेच असे नाही.

## घटना व हिंदू कोडची व्यूहरचना व फलश्रुति

आंबेडकरांना माहीत होते की आपल्याला **वर्गीय भांडवलदारी** घटना बनवावी लागेल. पण, जात्यन्ताशिवाय वर्गान्ताची वाट मोकळी होणार नाही हे त्यांनी १९३६ सालीच ओळखले होते (पाहा 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट'). 'इन्डिपेन्डन्ट लेबर पार्टी' काढल्यानंतर त्यांनी हेही पाहिले होते की, या देशातील डावे पक्ष जात्यन्तासाठी काहीएक करायला तयार नाहीत, 'दळे तिले कळे, आन् फुकटी गोंडा घोळे' (जी दळते तिलाच दळायचे कष्ट समजतात, ऐतखाऊ नुसती गोंडा घोळते), अशी आमच्या अहिराणीत म्हण आहे. जातिव्यवस्थेचे दुःख गावकुसाबाहेरील दलितां (आदिवासीं) नाच माहीत, गावकुसातील सवर्णां (शाहूं)ना त्याचे काय ? सायमन कमिशनसमोर साक्ष देताना आंबेडकरांनी स्वतःला केवळ अस्पृश्यांचा प्रतिनिधी म्हटले होते यात वावगे काहीच नाही. कम्युनिस्ट नाही का स्वतःला कामगारवर्गाचे प्रतिनिधी म्हणवीत ? कम्युनिस्टांना कामगारवर्ग जेवढा शोषितांचा प्रतिनिधी वाटतो, तेवढाच आंबेडकरांना अस्पृश्य हे भारतीय शोषित-पीडित जातिजमातींचे प्रतिनिधी वाटत. **म्हणून, वर्गव्यवस्थेच्या बालेकिल्ल्यावर प्रहार करण्याऐवजी जातस्त्रीदास्याच्या मुख्य तटबंदीवर प्रहार करायची व्यूहरचना त्यांनी आखली.** घटना जातिव्यवस्थाविरोधी बनवण्यावर त्यांनी यासाठीच भर दिला. **जात्यन्ताची त्यांची व्यूहरचना होती दलित–आदिवासी व ओ. बी. सी. या अनुक्रमे अतिशूद्र व शूद्र जातिजमातींची एकजूट.** त्यानुसार त्यांनी दलित–आदिवासींना शिक्षण व नोकऱ्यांत रिझर्वेशन द्यायची केंद्र सरकारतर्फे आणि ओ. बी. सीं.ना शिक्षण व नोकऱ्यांत रिझर्वेशन द्यायची राज्यसरकारांतर्फे तरतूद घटनेत केली. कोणत्याही वर्गाला आपला बुद्धिजीवी वर्ग जागतो, असे ग्राम्सी सांगतो. क्रांतिकारी वर्गाला तर आपल्या बुद्धिजीवी वर्गाची जास्तच गरज असते. **भारतीय लोकशाही क्रांतीचे नेतृत्व शूद्रातिशूद्र जातिजमातींमधून बुद्धिजीवी तयार झाल्याशिवाय निर्माण होऊ शकणार नाही हे आंबेडकरांनी जाणलें होते.** पण आंबेडकर यात अर्धेच यश मिळवु शकले. पहिल्या बॅकवर्ड क्लासेस कमिशनचे चेअरमन काका कालेलकर यांनी कमिशनचा रिपोर्ट राष्ट्रपतींना ३०–३–१९५५ ला सादर करताना जोडलेल्या नोटमध्ये अन्य मागास जातींना रिझर्वेशन देऊ नये असे आपले वेगळे मत मांडले. दाक्षिणात्य राज्यांनी जनआंदोलनाच्या जोरावर अन्य मागास जातींसाठी रिझर्वेशन मिळवून घेतले. ५० टक्क्यांवर एकूण रिझर्वेशन जाऊ नये या सुप्रीम कोर्टाच्या निकालाचा त्यांच्या ५० टक्क्यांवरील रिझर्वेशनवर काहीही परिणाम झाला नाही.

त्यांचा दुसरा प्रहार हिंदू कोड बिलाचा होता. भारतात बंगालमध्ये दायभाग, बाकी बऱ्याच भागांमध्ये मिताक्षरा, केरळमध्ये मरूमकट्टप्यम्, इ. कायदे प्रचलित होते. त्यांचे संहितीकरण (Codification) करणे आवश्यक होते. ते काम ब्रिटिश अमदानीत राव कमिटीने सुरू केलेले होते. पण, प्रत्येक कायद्याची तीन लक्षणे असतात, असे आंबेडकर त्यांच्या ११–६–५० ता. च्या भाषणात सांगतात (सत्यशोधक मार्क्सवादी, एप्रिल ८३) : पहिले निश्चितता (Certainty), दुसरे एकात्मता (unity) व तिसरे प्राप्त्यधिकार (accessibility). म्हणून, केवळ संहितीकरणाने कायदा होऊ शकत नव्हता, दुरुस्त्या केल्यानंतरच कायदा होऊ शकत होता. पण, दुरुस्त्या कोणत्या दृष्टिकोनातून व कितपत करायच्या ? प्राप्त परिस्थितीत त्या भांडवलदारी लोकशाहीवादी दृष्टिकोनातूनच होऊ शकत होत्या. अशा दुरुस्त्याही सामंती–सरंजामी धर्मशास्त्रांच्या तुलनेत पुढचे पाऊल होते. पण, धर्मशास्त्रांचा कायदा हा जातिव्यवस्थेचा कायदा होता, आणि स्वातंत्र्याची क्रांती ही जात्यन्ताची लोकशाही क्रांती होऊ नये अशी दक्षता काँग्रेस, कम्युनिस्ट व समाजवादी यांनी घेतली होती ! त्यामुळे धर्मशास्त्रांशी वा जातिव्यवस्थेशी तडजोड करूनच जातिव्यवस्थेवर प्रहार आंबेडकरांना करावा लागणार होता. हिंदू कोड बिल हे अशा तडजोडीची चढाई कशी होते हे आंबेडकर उपरोक्त भाषणाच्या शेवटी सांगतात–

'.. हे बिल काय करू इच्छिते ? ते जुन्या गोष्टी जशा आहेत तशा ठेवते आणि नव्या विचारांना प्राधान्य देते. जर सनातनी स्वजातीत लग्न करू इच्छित असेल तर त्याला त्यापासून काहीही परावृत्त करू शकत नाही. बिल जे काही म्हणते ते हे. जे सुधारक असून स्वजातीबाहेर लग्न करू इच्छितात त्यांना संरक्षण मिळेल. ज्यांना जातीबाहेरची मुले दत्तक घ्यायची आहेत त्यांना ते स्वातंत्र्य आहे, पण सनातन्याला स्वजातीचे मूल दत्तक घेण्यापासून हे विधेयक अडवणार नाही. हे बिल प्रत्येक हिंदूला आपल्या मालमत्तेचे मृत्युपत्र करायची परवानगी देत असल्यामुळे मुलीला मालमत्तेत दायभाग मिळाला तर खुद्द सनातनीही त्याविरुद्ध आवाज उठवू शकणार नाही. त्याची इच्छा असेल तर तो त्याच्या मृत्युपत्रात नमूद करू शकतो की, त्याची मालमत्ता त्याची मुलगी सोडून कोणीही घ्यावी.'

एवढी तडजोडसुद्धा काँग्रेसमधील व काँग्रेसबाहेरील सनातन्यांना सहन झाली नाही. त्यांनी शंकराचार्य, करपात्रीजी व जनसंघ यांच्या नेतृत्वाखाली हिंदू पुरुषांचे काय स्त्रियांचे प्रचंड मोर्चे संसदभवनावर नेले. राजकुमारी अमृत कौरने उत्तर भारताचा दौरा करून आल्यानंतर कॅबिनेटला सांगितले की, हे बिल मागे घेतले

नाही तर पुढच्या निवडणुकीत काँग्रेस हरेल. कॅबिनेटमध्ये एकदम नेहरूंचा आंबेडकरांना असलेला पाठिंबाही कोसळला. बिल मागे घेतले गेले आणि आंबेडकरांनी कायदेमंत्रिपदाचा राजिनामा दिला.

**हा कालखंड ऑल इंडिया वुइमेन्स कॉन्फरचा होता.** तिने बिलाच्या बाजूने स्त्रियांचे आंदोलन संघटित केले. ही सर्वपक्षीय व उच्चजातीयवर्गीय स्त्रियांच्या नेतृत्वाखालील स्त्री-मुक्ती संघटना होती. बिल वाचवायला जरी ती समर्थ नव्हती, तरी तिच्या आंदोलनामुळे नेहरू सरकारला १९५६ साली विवाह व वारसा हे सुधारित हिंदू कायदे करावे लागले. हे अर्थातच आंबेडकरांच्या हिंदू कोड बिलावर आधारित आहेत.

## जातिव्यवस्था: अरिष्टांचा कालखंड

सत्तरीपासून जातिव्यवस्थेच्या अरिष्टाचा कालखंड सुरू होतो. जातिव्यवस्थेच्या अरिष्टामुळे भारतीय जातिवर्गसमाजाचे अरिष्ट सर्वंकष झाले. सर्व जातवर्गांच्या स्त्रियांचे प्रतिनिधित्व करू पाहणाऱ्या ऑल इंडिया वुइमेन्स कॉन्फरन्सचा कालखंड संपला.

हा कालखंड महाराष्ट्रात दलित साहित्याच्या व प्रस्थापित रिपब्लिकन पक्षांच्या नेतृत्वाविरोधी दलित पँथरसारख्या युवक संघटनांच्या उदयाचा असला तरी दलित स्त्रियांच्या उद्रेकाचा अजून तरी नाही (दलित स्त्री-संघटना अखिल भारतीय बिरुदाखाली आहे ). मात्र वर्गवादी स्त्री-संघटनांचा राज्यपातळीपासून उदय याच कालखंडात होतो. मार्क्सवादी कम्युनिस्टपक्ष (माकप) प्रणीत महाराष्ट्र राज्य श्रमिक महिला संघाची स्थापना ७५ मध्ये होते. मे ७५ अखेर साक्रीला झालेल्या जिल्हा माकपच्या पक्ष जनरल बॉडी बैठकीस कॉ. नजूबाई गावित यांच्या प्रश्नाला उत्तर देताना कॉ. ज्योति बसू म्हणाले, " प. बंगालची स्त्रीसंघटना मोठी असली तरी ती शहरांपुरती मर्यादित आहे." कॉ. बसू त्यावेळी पं. बंगालचे मुख्यमंत्री होते.

१९७७ साली केंद्रात जनता पक्षाचे सरकार आले. त्यात सर्वांत संघटित व प्रभावी पक्ष जनसंघ होता. हिंदू-मुसलमान दंगलीच्या भरीला दलित आदिवासींविरोधी दंगली सुरू झाल्या जातिव्यवस्थेचे अरिष्ट झपाटयाने तीव्रतर होऊ लागले. स्त्रियांवरील अत्याचार न भूतो न भविष्यति वाढले. कम्युनिस्ट पक्षाच्या स्त्री-संघटना राज्यस्तरावरून अखिल भारतीय स्तरावर गेल्या. माकपच्या ' ऑल इंडिया डेमॉक्रॅटिक वुइमेन्स असोसिएशन 'ची पहिली परिषद १९८१ साली झाली. याच सुमारास भारतीय कम्युनिस्ट पक्षाची (भाकप) भारतीय महिला फेडरेशन स्थापन झाली. या स्त्रीसंघटना स्त्रीदास्य वर्गव्यवस्थेतून आले असे मानणाऱ्या

आहेत. कारण त्यांच्या दृष्टीने वर्ग हीच एकमेव शोषणशासनाची भौतिक संस्था आहे, तर वर्णजात या मानसिक व्यवस्था आहेत, स्त्रियांतील वर्णभेदच त्यांना मान्य आहेत जातिभेद नाहीत. अतिशूद्र जातिजमातींच्या बहुसंख्य स्त्रिया खेड्यात गाव-कुसाबाहेर राहातात आणि अतिशूद्र सामाजिक सर्वहारा हा या देशाचा पाव हिस्सा (२२.५० टक्के) आहे ही अनन्य वस्तुस्थिती त्यांच्या मते माया (Ascriptive, stereotype) आहे. तरीही शहरी कामगार वर्ग हा सर्वांत क्रांतिकारक व म्हणून सर्वांत शोषित, ही या स्त्री–संघटनांची धारणा असल्यामुळे त्यांनी शहरी कामगार व मध्यमवर्गीय स्त्रियांवर भर देणे साहाजिक होते. माकपचे सर्वांत मोठे युनिट व जनसंघटन ठाणे जिल्ह्याच्या आदिवासी भागात असूनही आणि त्यांच्या नेत्या कॉ. गोदावरी परुळेकर असूनही ७४ अखेरपर्यंत तेथे श्रमिक महिला संघाचे युनिट नव्हते. महाराष्ट्र राज्य श्रमिक महिला संघाची स्थापना परिषद मुंबईला जानेवारी ७५ मध्ये झाली, तेव्हा त्याआधी घाईघाईने ठाणे जिल्ह्यात श्रमिक महिला संघाचे युनिट स्थापन झाले.

पारंपरिक कम्युनिस्ट पक्षापासून स्त्रीसंघटनेची काय, त्यांच्या कोणत्याही जनसंघटनेची, स्वायत्तता नाममात्र असते. याचे कारण पारंपरिक मार्क्सवादाची समाजवादी लोकशाही संकल्पनाच अनैतिहासिक, नित्यतावादी व पुरुषसत्ताक असल्याचे गोर्बाचेव कालखंडाने सिद्ध केले आहे. शुद्ध मार्क्सवाद–लेनिनवादाचा झेंडा केवळ आपणच (सी. पी. एस. यू. च्याही तुलनेत) फडकत ठेवला आहे, असा माकप–नेतृत्वाचा कितीही दावा असला तरी खुद्द मार्क्सवाद–लेनिनवादच सोविएत युनियनपुढील 'ग्लास्नोस्त' व 'पेरेस्त्रॉयका' ची ठाम उत्तरे देऊ शकत नाही त्याचे काय? 'समाजवादी लोकशाही क्रांती' ही अभिजात मार्क्सवाद–लेनिन-वादाच्या कोणत्या टेक्स्ट–बुकात सांगितलेली आहे?

दक्षिणेतील ब्राह्मणेतर चळवळ महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीपुढे गेलेली असली तरी ती आंबेडकरी दलित चळवळीपर्यंत जाऊ शकलेली नाही. पण दक्षिणेतल्या जातिविरोधी चळवळीमुळे अहिंदू धर्मांमधील आदिद्रविडांना, दलितांना आत्मभान आले. इस्लाम हा भारतात जातिग्रस्त कसा झाला आहे हे इम्तियाज अहमद संपादित 'कास्ट अँड सोशल स्ट्रॅटिफिकेशन अमंग मुस्लिम्स इन इंडिया' या पुस्तकात अनेक मुसलमान विद्वानांनी दाखवले आहे. दक्षिणेत 'नव मुसलमानां'च्या साध्या व जुम्मा मशिदी आणि दफनभूमी वेगळ्या आहेत. नव ख्रिश्चनांना धर्मगुरुपद व त्यापुढील बढत्या मना आहेत असे जोसे कननैकल त्यांच्या 'ख्रिश्चन ऑफ शेड्यूल्ड कास्ट ओरिजिन' या पुस्तकात सांगतात. हे लिखाण, हे आत्मभान व नवख्रिश्चनांच्या या चळवळी मुख्यत्वेकरून ७७ नंतरच्या कालखंडात उसळल्या आहेत. पण अहिंदू धर्मांच्या जातिविरोधी चळवळी बोहरा व सत्यशोधक

मुस्लिम चळवळी सोडल्यास–स्त्रीमुक्ती चळवळींच्या उठावणीपर्यंत जाऊ शकलेल्या नाहीत. हे सुरुवातीलाच सांगितले आहे.

फेमिनिझमचा (स्त्रीवाद) प्रवेश महाराष्ट्राच्या स्त्रीमुक्ती चळवळीत याच कालखंडात होतो. स्त्रीवाद हा कम्युनिस्टविरोधी असल्याचे मानून त्यांचे विधायक योगदानही आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळ **अधिकृतरीत्या** स्वीकारायला तयार नाहीत. सोविएत युनियनमध्ये गोर्बाचेव कालखंडात केवढ्या उलथापालथ होत आहेत ? समाजवादी लोकशाहीच्या विकृत संकल्पनेच्या बळी स्त्रिया कशा आहेत हे साखारोवची पत्नी त्याच्याबरोबर ८ वर्षे स्थानबद्ध होती यावरून दिसून आले असूनही, गोर्बाचेव्हने फेमिनिझमचा साधा उल्लेखही केलेला नाही, मग चर्चा दूरच. गोर्बाचेव्हचे अजूनही असे मत आहे की, ग्लास्नोस्त व पेरेस्त्रॉयिकाची उत्तरे पारंपरिक मार्क्सवाद–लेनिनवादातच सापडतील. खरे म्हणजे ग्लानोस्त व पेरेस्त्रॉयिका हे प्रश्नांचे अचूक प्रश्न आहेत, उत्तरे नाहीत, हे त्यांच्या लक्षात येत नाही.

पुरुष कामगाराचीच श्रमशक्ती अतिरिक्त मूल्य तयार करते. स्त्रीचे गृहश्रम करीत नाही, अशी मार्क्सची धारणा आहे. शरद जोशींनी अचूकपणे मांडले आहे की, अविवाहित कामगाराला खानवळीचे पैसे द्यावे लागतात यावरून स्त्रीच्या गृहश्रमाला मूल्य असते असे स्पष्ट होते. स्त्री केवळ कामगारांचे पुनरुत्पादन करते एवढेच मार्क्सने गृहीत धरलेले आहे. मार्क्सवादी अर्थशास्त्राची व ऐतिहासिक भौतिकवादाची मांडणी पुरुषसत्ताकतेनी प्रभावित झालेली आहे. हे नाकारण्यात मार्क्सवादाचेच नुकसान आहे. मार्क्सवादाने तळे न बनता प्रवाह राहायचे असेल तर त्याने नवनवीन योगदाने स्वीकारली पाहिजे. **भांडवलदारी समाजाने केलेला विज्ञानाचा व तंत्राचा विकास जर समाजवादी देश स्वीकारू शकतात, मग ज्ञानाच्या बाकी क्षेत्रात भांडवलदारी समाजाने केलेला विकास का स्वीकारू शकत नाहीत ?**

पुरुषानीच स्त्रीचे पीडन केलेले आहे, स्त्रीने कधीच पुरुषाचे पीडन केलेले नाही या आवडत्या सिद्धान्तापायी फेमिनिझम इतिहासातील स्त्रीसत्ताक समाजाचे अस्तित्व मानायला तयार नाही. स्त्रीवाद येथील नवब्राह्मणी स्त्री-नेतृत्वांच्या हातात गेल्यामुळे तोही शहरी स्त्रीमुक्तीचळवळीत पुरुषद्वेष्टया अतिजहालवादाच्या स्वरूपात घुटमळत राहिला.

स्त्रीवादाच्या विधायक योगदानांचा स्वीकार सर्वात अगोदर सत्यशोधक कष्टकरी महिला सभेने (सकमस) केलेला आहे. हा योगायोग नव्हता. आदिवासी स्त्रियांना आंबेडकरांच्या हिंदू कोड बिलाधारित सुधारित हिंदू (विवाह व वारसा) कायदे लावून त्यांना पुरुषसत्ताक तोंडी कायद्याच्या मगरमिठीतून सोडवावे या मागणीवर ७७ सालापासून महाराष्ट्र श्रमिक महिला संघामध्ये कॉ. नजूबाई

गावित व त्यांच्या सहकारी स्त्रियांनी जो संघर्ष सुरू केला आणि त्याला संघाच्या नवब्राह्मणी नेतृत्वाने जो विरोध केला त्यातून सत्यशोधक कष्टकरी महिला सभेचा १९७९ साली जन्म झाला. जातवर्ग स्त्रीदास्यान्ताचे उद्दिष्ट असलेली, मुद्रित घटना असलेली व दरवर्षी किमान २००० सभासद करणारी महाराष्ट्रातील ही एकमेव तळागाळातील स्त्रीमुक्ती जन संघटना आहे.

शेतकरी संघटनेने ९–१० नोव्हें. ८६ ला घेतलेल्या चांदवड महिला मेळाव्याची प्रेरणासुद्धा सकमसने दिली होती. महाराष्ट्रातील शेतकरी स्त्रियांचा हा देशाच्या इतिहासातला अभूतपूर्व मेळावा होता. जिल्हा परिषद निवडणुकांच्या चळवळीत शेतकरी महिला आघाडीचे रूपांतर समग्र महिला आघाडीत (समआ) करण्यात आले. चांदवड मेळाव्याने ज्याप्रमाणे स्त्री अत्याचाऱ्यांना शासनातून काढण्यासाठी राजीव निवासाला स्त्रियांचा घेराव घालायचे जाहीर केले होते, त्याप्रमाणे समआने तालुका पंचायत व जिल्हा परिषदांना १०० टक्के स्त्री उमेदवार उभे करायचे जाहीर केले होते. राजीव निवासाला घेराव घालायचा कार्यक्रम जसा फसला, तसा समआचाही कार्यक्रम, निवडणुका झाल्या असत्या तर, फसला असता. शेतकरी वा ओबीसी स्त्रियांचे खास प्रश्न शरद जोशींना शोधून काढता न आल्यामुळे ते अशा घोषणांनी वेळ मारून नेत आहेत.

चांदवडच्या ' शिदोरी 'तच शरद जोशींनी फेमिनिझमची विधायक योगदाने स्वीकारली आहेत. पण त्यांच्या शेतकरी संघगनेला वा समआला कोणताही ठाम तत्त्वज्ञानात्मक पाया नाही. ' शेतकरी तितुका एक एक ' या घोषणेप्रमाणे ' स्त्रिया तितुक्या एक एक ' ही त्यांची घोषणा आहे.

शेतीमाल-भावाचा प्रश्न सोडवला की पंजाबचा प्रश्न सुटेल, असे मत त्यांनी मांडले होते. त्यावेळी ते शेतीमालभावाचा प्रश्न सुटला की देशाचे सर्व प्रश्न सुटतील अशी वैदूची भूमिका घेत होते. काही पिकांचा भाव वाढवून मिळाल्यानंतर शेतकरी पुरुष व्यसनाधीन होऊन त्याच्या बायकोचा कर्दनकाळ बनतो हे पाहिल्यानंतर त्यांनी शेतकरी मुक्तीपासून स्वतंत्र अशी स्त्रीमुक्तीची भूमिका घेतली. वर्ग नावाची संस्था अस्तित्वातच नसल्याचे ते मानतात. जातीचे अस्तित्व त्यांना मान्य असूनही ते जात्यन्ताचा लढा म्हणजे ' उष्ट्या पत्रावळीसाठी भांडण ' असल्याचे म्हणतात ! उपजत नेता असलेला व शेतकऱ्यांच्या नाडीवर अचूक हात ठेवणारा हा देशातला महत्तम शेतकरी नेता आहे. पण आपल्या स्त्रीसंघटनेसाठी फेमिनिझमची विधायक योगदाने स्वीकारणारा हा माणूस शेतकरी पुरुषांच्या लढ्यांसाठीच शेतकरी स्त्रियांना वापरून घेतो आहे,

## स्त्रीमुक्तीची कोंडी

स्त्रीमुक्तिचळवळीचा एवढा विकास होऊनही तिची कोंडी फुटलेली नाही.

चांदवड शेतकरी महिला मेळावा ८६ मध्ये झाल्यापासून अजून दुसरा मेळावा झालेला नाही की शेतकरी लढ्यांप्रमाणे शेतकरी स्त्रियांचा लढा उभारला गेलेला नाही.

पारंपरिक कम्युनिस्ट पक्ष शरद जोशी व महेन्द्रसिंग टिकैतप्रमाणे एकही व्यापक लढा उभारायला तयार नाहीत. ते भारत बंद, दिल्ली मोर्चा, इ.ची उदाहरणे देतील. शेतकरी संघटनेने लढे करून दक्षिण महाराष्ट्र व कोकण सोडला तर बाकी सर्व महाराष्ट्र केवळ ८ वर्षांत व्यापला आहे. आणि प्रत्येक लढ्यात मागण्या काहीना काही प्रमाणात मिळवलेल्या आहेत. पारंपरिक कम्युनिस्ट पक्षांची व्यापक आंदोलने प्रतीकात्मक असतात, मागण्यांच्या चार्टरमधून काहीना काही मागण्या जनतेला मिळवून दिल्याचे दिसत नाही आणि वाढते प्रदेश व्यापत जायची फलश्रुती त्यांच्या लढ्यांमधून होताना दिसत नाही. देशातील जनतेचा सर्वांत मोठा विभाग असलेला शेतकरी तर डाव्यांकडून अजिबात हलवला जाताना दिसत नाही. राजकारणात पोकळी राहात नसल्याने ओबीसी मूलतत्त्ववाद्यांच्या मागे जाताना दिसत आहेत. दलित व आदिवासी कामगार कास्ट अँड ट्राइब, डी. एस. फोर, इ. सारख्या जातजमातीय कामगार संघटनां मागे आहेत, तर ग्रामीण दलित–आदिवासी जनता जातिव्यवस्थाविरोधी कार्यक्रमाच्या अभावी हलू शकत नाही आणि त्यामुळेच ती तिच्या जातजमातीय वा काँग्रेस नेतृत्वांमागे आहे. दलित व आदिवासी २२.५ टक्के आणि ओबीसी ५२ टक्के मिळून ७४.५ टक्के भारतीय जनता मूलतत्त्ववादी वा भांडवलदारी शक्तींच्या मागे असता या देशाचे समाजपरिवर्तन कसे होणार ?

जातिव्यवस्थेचे अरिष्ट निकराला आल्यामुळेच जातवर्गीय भारतीय समाजाचे अरिष्ट सर्वंकष बनले आहे आणि सर्व धर्मांच्या मूलतत्त्ववादी शक्ती राज्यकर्त्या पक्षाच्या प्रोत्साहनाने आक्रमक बनत आहेत, ह्याची एकही डावा पक्ष आपल्या राजकीय ठरावात दखल घ्यायला तयार नाही. **आमचे मत आहे की या देशातील पुरुषमुक्तीची कोंडी स्त्रीमुक्तीच्या कोंडीमुळे झालेली आहे. कारण या देशातल्या शूद्रातिशूद्र स्त्रिया जात, वर्ग व पुरुष या तिहेरी बेड्यांनी जखडलेल्या आहेत, तर शूद्रातिशूद्र पुरुष जात व वर्ग या दोनच बेड्यांनी.**

**स्त्रीमुक्तीच्या चळवळीच्या कुंठिततेचे कारण वैचारिक अस्पष्टता, किंबहुना ती ठेवायची उच्चजातीय डाव्या स्त्रीनेतृत्वाची धडपड.** 'श्रमिक विचार' मध्ये झालेल्या डिबेटमध्ये काही डाव्या स्त्रिया 'स्त्रिया तितुक्या एक एक' ही वर्गवर्णातीत भूमिका घेताना दिसल्या. एंजेला डेव्हिस ही अमेरिकन कम्युनिस्ट पार्टीची सभासद; पण तिने तिच्या 'वुईमेन, रेस अँड क्लास' या पुस्तकात कृष्णवर्णीय स्त्रियांची चळवळ गोऱ्या स्त्रियांच्या चळवळीहून वेगळी असायच्या गरजेचे

सप्रमाण समर्थन केले आहे. वंश (वर्ण) ही संस्था वर्गाप्रमाणेच शोषणपीडनाची भौतिक संस्था आहे, असे मांडायचेच तिने बाकी ठेवले आहे. पण, भारताच्या पारंपरिक, डाव्या स्त्रीमुक्ति चळवळीतील कार्यकर्त्या मात्र वर्गव्यवस्थेप्रमाणे जातिव्यवस्थेविरोधी स्त्रीमुक्तिचळवळीचा पुरस्कार करीत नाहीत एवढेच नाही, तर तिला कसून विरोध करतात.

स्त्रीमुक्तिसंघटनांच्या संपर्क समितीतर्फे मुंबईला टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसमध्ये १७ व १८ सप्टेंबर ८८ या तारखांना हिंदू कायदे आदिवासी स्त्रियांना लावायच्या प्रश्नावर चर्चासत्र झाले. महाराष्ट्राच्या सर्व स्त्रीसंघटनांच्या व इतर निमंत्रित संघटनांच्या कार्यकर्त्या व कार्यकर्ते हजर होते. आदिवासी स्त्रियांच्या प्रश्नावर चर्चासत्र असूनही सुरगाणा तालुक्यातील मोहना चौधरी ही बालकल्याण समितीची कार्यकर्ती व कॉ. नजूबाई गावित सोडल्या तर एकही आदिवासी कार्यकर्ती हजर नव्हती. आदिवासी स्त्रीला तोंडी कायद्यामुळे पिता वा पतीच्या मालमत्तेत वाटा मिळत नाही, पुरुषाला अनेक बायका करायची मुभा असल्यामुळे तो पहिली बायको केव्हाही सोडू शकतो, देज ( Bride-Price ) पद्धतीमुळे स्त्रीला देज परत केल्याशिवाय फारकत मिळू शकत नाही आणि त्यामुळे पोटगीही मिळू शकत नाही, जातपंचात स्त्रिया नसल्यामुळे जातपंचायत स्त्रियांविरुद्धच न्याय देते, आदिवासी स्त्री शाहू स्त्रीपेक्षा स्वतंत्र नसून जास्त परतंत्र आहे, आणि त्यामुळे सुधारित हिंदू कायदे हिंदू आदिवासी स्त्रियांना लावावे, अशी मांडणी कॉ. नजुबाईंनी व मी केली. पण उपस्थित सर्व स्त्री-पुरुष कार्यकर्त्यांनी मांडले की, आदिवासींना धर्म नसल्यामुळे त्यांना हिंदू कायदे लावल्याने त्यांचे हिंदूकरण होईल, जमातवाद भडकेल व राष्ट्रीय एकात्मतेचा भंग होईल. माकपच्या डॉ. डी. एल. कराडनी सांगितले की, हिंदू कायदे लावल्यास आदिवासींना भटजी व सप्तपदीने लग्ने करावी लागतील. ॲड. वसुधा कराड म्हणाल्या की, सुरगाणा तालुक्यात पुरुष क्वचित एकापेक्षा जास्त बायका करतात, इंडियन पिनल कोडान्वये फिर्याद करून आदिवासी स्त्री पोटगी व वारसा मिळवू शकते आणि कोर्टापेक्षा जातपंचायतीकडून स्त्रियांना लगेच व योग्य न्याय मिळतो. माकपच्या ह्या कराड दांपत्याचे म्हणणे किती खोटे होते हे हिंदू कोड बिल व सुधारित हिंदू कायदे यांचे जे सुरुवातीलाच आंबेडकरप्रणीत विवरण दिले आहे त्यावरून आणि नवी दिल्लीच्या ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सच्या शिफारशीवरून मुंबईच्या जे. जे. हॉस्पिटलच्या इन्स्टिटयूट ऑफ चाइल्ड हेल्थचे प्रमुख डॉ. आर. बी. पटेलनी पालघर (जि. ठाणे) व सुरगाणा (जि. नाशिक) तालुक्यांचा सर्व्हे करून जो अहवाल सादर केला त्यावरून दिसून येते. हा अहवाल सांगतो की, आदिवासी पुरुष सरासरी १० लग्ने करतो, बायकांची खरेदी-विक्री होते आणि स्त्रियांना जनावरांपेक्षाही वाईट वागवले जाते

(इंडियन एक्सप्रेस, २२-९-८८). या अहवालाविरुद्ध सुरगाणा तालुक्यात बंद पाळला गेला, असेंब्लीतही तावातावाने चर्चा झाली. पण बंद तर डाव्या पक्षापेक्षा शिवसेने-सारख्या संघटना जास्त यशस्वीपणे करतात आणि सुरगाणा बंदमध्ये शिवसेना व भाजप असतीलच. ओरिसातील कलहंडी जिल्ह्याचे आदिवासी आपली मुले विकतात, ओरिसा व बिहारमधील आदिवासी स्त्रियांची कंत्राटदारांकडून पोटे येतात आणि मग आदिवासीच माता अपत्यांना बहिष्कृत करतात या हकीकती खोटचा का? वस्तुस्थिती किती भीषण आहे हे आम्ही सिद्ध करून द्यायला तयार आहोत. कॉ. प्रभा सावंतनी १८ तारखेला ला सकाळी मांडले की, हिंदू कायदे आदिवासींना लावू नये असा या बैठकीने ठराव करून हा प्रश्न निकाली काढावा. पण नंतर ॲड. इंदिरा जयसिंगनी येऊन अधिकारवाणीने विवेचन करून सांगितले की, आदिवासींचे तोंडी कायदे हे असुधारित हिंदू कायदे असल्याने सुधारित हिंदू कायदे हिंदू आदि-वासी स्त्रियांना लावल्यास त्यांचा निश्चितच सापेक्ष फायदा होईल. धर्माच्या बाबतीत त्यांनी सांगितले की आदिवासी कोर्टात उभा राहिल्यानंतर त्याला/तिला कोर्ट विचारते की, तुझा धर्म कोणता? मुसलमान व ख्रिश्चन नसेल तर कोर्ट त्यांचा धर्म हिंदूच गृहीत धरते. आणि तरीही तो/ती आदिवासी असल्यामुळे त्याला/तिला सुधारित हिंदू कायदे न लावता तोंडी म्हणजे असुधारित हिंदू कायदेच लावते. (मुसलमान व ख्रिस्ती नसलेले आदिवासी शिक्षण व नोकऱ्यांसाठी रिझर्व्हे-शन मिळावे म्हणून हिंदू धर्म लावतात एवढेच नाही, तर मुसलमान व ख्रिस्ती आदिवासीसुद्धा हिंदू धर्म लावतात या वस्तुस्थितीकडे ही 'कर्मठ' मंडळी लक्ष द्यायला तयार नाही.)

संपर्क समितीच्या एक कार्यकर्त्या कॉ. लता भिसे यांनी माकपच्या जीवन-मार्गमध्ये (२३-१०-८८) चर्चासत्राच्या दिलेल्या वार्तापत्रात म्हटले आहे.

'या चर्चासत्रात ॲड. इंदिरा जयसिंग यांचाही महत्त्वपूर्ण सहभाग होता. आदिवासी स्त्रियांना हिंदू कोड लागू करण्यास त्यांनी कडाडून विरोध केला...'

मी प्रामाणिक विरोध समजू शकतो; पण देशातल्या सर्वांत मोठ्या डाव्या पक्षाची स्त्रीसंघटना खोटारडेपणाचा आश्रय घेते यावरून काय दिसते? सुधारित हिंदू कायदे हिंदू आदिवासी स्त्रियांना लावल्याने त्यांचे हिंदूकरण होईल, म्हणजे आंबेडकर हे हिंदू धर्माचे पुरस्कर्ते होते काय? आंबेडकरप्रणीत कायद्यां-मुळे जमातवाद भडकून राष्ट्रीय एकात्मतेचा भंग होणार आहे काय? आदिवासी स्त्रियांचे भवितव्य त्यांना अनुपस्थित ठेवून या उच्चजातीय स्त्रीमुक्ति-कार्यकर्त्या ठरवणार आहेत काय? (या कार्यकर्त्यांत काही फेमिनिस्ट आहेत. यावरून भारतीय फेमिनिस्टांचा प्रकारही ठरवावा लागेल.)

राष्ट्रपतींनी नोटिफिकेशन काढले की हे सुधारित हिंदू कायदे हिंदू आदिवासी स्त्रियांना लागू होतील. त्यासाठी दिल्लीपर्यंत काही हजार आदिवासी स्त्रियांनी पदयात्रा काढावी आणि राष्ट्रपतिभवनासमोर धरणे धरावे अशी सूचना सकमसने केलेली आहे. या पदयात्रेत सकमस २००० आदिवासी स्त्रिया टाकायला तयार आहे. आदिवासी स्त्रियांचा कौल घेण्यासाठी आदिवासी स्त्रियांचे पहिले शिबिर पिंपळनेरला घ्यायचा प्रस्तावही सकमसने चर्चासत्रात ठेवलेला आहे. व तो सर्वानुमते मान्य झालेला आहे. चेंडू आता संपर्क समितीच्या कोर्टात आहे.

## वैचारिक कोंडी

यावरून भारतीय स्त्रीमुक्ति चळवळीची कोंडी तिच्या ब्राह्मणी वा भटाळलेल्या नेतृत्वांनी जातजमातीचा पायाभूत घटक दुर्लक्षिल्यामुळे झालेली आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे भारतीय स्त्रीमुक्ति चळवळीत मुख्य वैचारिक संघर्ष वर्गवादी मार्क्सवाद व जातवर्गस्त्रीदास्यान्तवादी मार्क्सवाद-फुलेआंबेडकरवाद यात आहे, हे उघड होते. हा विरोध आज महाराष्ट्र पातळीवर आला आहे. पण तो देशाच्या पातळीवर लौकरच येणे अटळ आहे. कारण जातवर्गस्त्रीदास्यान्त अटळ आहे.

'असंतोष'
धुळे ४२४ ००२.

शरद पाटील

## टीपा

१, गाथा अप्सरांना 'परिचारिका' म्हणते. अप्सरा (अद्भ्य : सरन्ति) या शब्दशः नदीदेवता. आद्य शेतीचा ( सिंधुवक्त्र ) जन्म नदीखोऱ्यात झाला. आद्य मातृदेवता निर्ऋति ही सिंधुखोऱ्यातील ऋतगणाची राणी, गणिका. गणिका वेश्या झाली व अप्सरा देववेश्या ! पुरुष हा स्वामी स्वतंत्र; म्हणून स्त्रीमुक्तीची संकल्पना पुरुष व्हायची !

# परामर्श प्रकाशन

(१) प्राचीन भारतीय नाट्यमीमांसा आणि साहित्यमीमांसा यांमधल्या उपपत्तींची पुनर्मांडणी करणारा ग्रंथ –

## प्राचीन भारतीय साहित्यमीमांसा : एक आकलन

लेखक : **डॉ. अशोक केळकर**

(पृष्ठे ७८, किंमत १० रु.)

(२) ब्रह्मसूत्र–शांकरभाष्यावरील श्रीवाचस्पतिमिश्रलिखित 'भामती' या भाष्यग्रंथातील चतुःसूत्रीभागाचे मराठी विवरण, अद्वैतवेदांताच्या अभ्यासकांनी वाचलाच पाहिजे असा ग्रंथ–

## श्रीभामतीप्रकाश [१ व २]

लेखक : **म. म. यज्ञेश्वरशास्त्री कस्तुरे**

(प्रत्येक खंड सुमारे २५० पानी, प्रत्येक खंडाची किंमत ४० रु.)

(३) प्राचीन भारतात उदयाला आलेल्या व विकसित झालेल्या तर्कशास्त्राची आधुनिक मांडणी व चिकित्सा करणारा मराठीतील एकमेव ग्रंथ –

## भारतीय तर्कशास्त्राची रूपरेखा

लेखक : **डॉ. सुरेंद्र बारलिंगे, डॉ. क्रांतिप्रभा पांडे**

(पृष्ठे २२४, किंमत ४० रु.)

(४) भाषेच्या स्वरूपाची तात्त्विक भूमिका मांडणारा नागेशभट्ट लिखित ग्रंथ. संस्कृत भाषा, व्याकरण, भाषाशास्त्र व तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांस उपयुक्त –

## परमलघुमंजूषा [भाग १]

(मूळ संस्कृत ग्रंथ व त्याचा पं. वा. बा. भागवतकृत मराठी अनुवाद)

(पृष्ठे १०९, किंमत १२ रु.)